# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२२३१०४


## निविदा सूचना

क्र. गोंवि/आस्था/सुरक्षारक्षक/१५–१६/२०१५ दिनांक :– २९/१०/२०१५

या कार्यालयाच्या सुरक्षेकरीता सुरक्षागार्डची आवश्यकता आहे. तरी शासकिय मान्यताप्राप्त व अनुभवी पुरवठा एजंसीकडुन निवीदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | निविदेचा प्रकार | को–या निविदा प्रपत्राची किंमत (नापरतावा) | निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख व वेळ | निविदा उघडण्याची तारीख व वेळ | निविदा ज्यांचे कडून मागविण्यात येत आहेत त्याचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा सुरक्षागार्डचा पुरवठा | ५००/– | दि. १९/११/२०१५ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत | दि. २३/११/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता | शासकिय / आय.एस.ओ. नोंदणीकृत अनुभवी मनुष्यबळ पुरवठा एजन्सीकडून |

ज्यांनी विद्यापीठास/शासकीय कार्यालयास/कंपनीस यापूर्वी सुरक्षागार्डचा पुरवठा केला आहे अशा शासकीय मान्यताप्राप्त व अनुभवी एजंसीकडून मोहोरबंद लिफाफ्यात निविदा मागविण्यात येत आहे. मोहोरबंद लिफाफ्यात निविदा भरुन दैनिक वृत्तपत्रात निविदा प्रसिध्दी झाल्यापासुन दिनांक २९/१०/२०१५ पासुन ते दिनांक १९/११/२०१५ रोजी कार्यालयीन वेळेत कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. सदर निविदा दि. २३/११/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता उघडण्यात येतील. कोणतेही कारण न देता निविदा स्विकारण्याचे व नाकारण्याचे हक्क विद्यापीठाने स्वत:कडे राखुन ठेवलेला आहे.

निविदा प्रपत्र / सुचनापत्र / अटी व शर्ती www.unigug.org किंवा www.gondwana.digitaluniversity.ac या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

(डॉ. विनायक ईरपाते)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

दिनांक २६/१०/२०१४
ठिकाण गडचिरोली

# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

## निविदा अर्ज

**प्रति,**

मा. कुलसचिव,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय** :— विद्यापीठ कार्यालय व परिसर सुरक्षेकरीता शासकिय मान्यताप्राप्त व अनुभवी सुरक्षा एजंसीकडुन सुरक्षागार्डचा पुरवठा करण्याबाबत निवेदन.

**संदर्भ** :— विद्यापीठाची निविदा सूचना क्र. गो.वी./आस्था / सुरक्षागार्ड १५—१६/२०१५, दिनांक २९/१०/२०१५.

**महोदय,**

मी श्री ———————————————— निविदा सादरकर्ता संदर्भीत निविदा सूचना जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त निविदा अर्ज वाचलेले असून त्यातील अटी व शर्तीशी पूर्णपणे सहमत आहे. विद्यापीठ कार्यालयाच्या सुरक्षेकरीता शासकिय मान्यताप्राप्त व अनुभवी सुरक्षा एजंसीकडुन सुरक्षागार्डचा पुरवठा करण्याबाबत तयार असल्याबद्दल हया निविदेद्वारे लिहून देत आहे.

१) पुरवठा संस्थेचे नांव : ————————————————————

२) संपूर्ण पत्ता :————————————————————
————————————————————————————
————————————————————————————

| | | | |
|---|---|---|---|
| ३) | शासकिय नोंदणी प्रमाणपत्र | : | जोडले आहे / नाही |
| ४) | संस्थेचा PAN क्रमांक | : | ———————— |
| ५) | इन्कमटॅक्स रिटर्न सोबत जोडावे (कालावधीसह) | : | जोडले आहे / नाही |
| | २०१२—१३ | : | ———————— |
| | २०१३—१४ | : | ———————— |
| | २०१४—१५ | : | ———————— |
| ६) | EPF कार्यालयाचे No Due/पडताळणी अहवाल | : | ———————— |
| | वर्ष २०१३—१४ | : | ———————— |
| | वर्ष २०१४—१५ | : | ———————— |
| ७) | PF रजीस्ट्रेशन क्रमांक | : | ———————— |
| ८) | ESI रजीस्ट्रेशन क्रमांक | : | ———————— |
| ९) | सुरक्षा एजन्सी संबंधीचा नोंदणी क्रमांक | : | जोडले आहे / नाही |
| १०) | पोलीस अनुज्ञप्ती प्रमाणपत्र | : | जोडले आहे / नाही |
| ११) | विद्यापीठ किंवा शासकिय कार्यालय किंवा इतर सार्वजनिक संस्थांना हया निविदा राशीच्या किंवा त्याहुन अधिक राशीची सुरक्षागार्ड पुरवठा केल्याबाबत पूर्वानुभव असल्याची कागदपत्रे तसेच पुरवठाकार्य पुर्ण केल्याबद्दलचे प्रमाणपत्र. | : | **जोडले आहे / नाही** |

बुराडे E:\Tenders latter\Security\15-16

१२) निविदा सादर कर्त्याने/सार्थीने/सुरक्षा एजन्सीने त्यांना निविदा भरण्यास त्यांच्या कंपनीच्या वतीने अधिकृत करण्यात आल्याबाबतचे मुळ अधिकार पत्र सोबत जोडावे. अधिकारपत्रामध्ये निविदा जाहिरात क्रमांक व दिनांक नमुद असणे आवश्यक आहे.

(या अटीनुसार कोणत्याही सुरक्षा एजन्सीने त्यांच्या वतीने कोणत्याही एकास निविदेसाठी अधिकृत करणे अपेक्षीत आहे) : **जोडले आहे / नाही**

१३) निविदा प्रपत्र मध्ये नमुद सुरक्षा एजन्सीने आय.एस.ओ. प्रमाणपत्र प्राप्त झाले अल्यास याबद्दलचे प्रमाणपत्र जोडावे. : **जोडले आहे / नाही**

१४) अर्जासोबत जोडावयाच्या **अनामत रक्कमेची** माहिती.

| जोडले आहे/ नाही (बँकेचे नांव) | शाखा | धनाकर्ष क्र. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१५) अर्जासोबत जोडावयाचे **निविदा शुल्क** अदा केल्याबाबतची माहिती :

| जोडले आहे / नाही (बँकेचे नांव) | शाखा | धनाकर्ष क्र. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| | | | | |

उपरनिर्दीष्ठ सादर केलेली माहिती पूर्णपणे सत्य आहे. अनामत रक्कम व निविदा शुल्क अदा केल्याबद्दलची (डीमांड ड्राप्ट) माहिती सादर केलेली आहे.

सार्थाचे / निविदा सादरकर्ता/ पुरवठादार सुरक्षा एजन्सी फर्मचे नांव : ——————

PAN क्रमांक . —————————— दुरध्वनी क्र. ——————————

भ्रमनध्वनी क्र. ——————————

ठिकाण :

दिनांक :

स्वाक्षरी : ——————

स्वाक्षरी कर्त्याचे नांव : ——————

(निविदाकर्ता/ पुरवठादार सुरक्षा एजन्सी/ सार्थाचे नाव) : ——————

(सही व शिक्का)

# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

**निविदा सुचना क्र.गोवि/आस्था/सुरक्षागार्ड १५–१६/२०१५, दिनांक २९/१०/२०१५**

## सर्वसामान्य सुचना, अटी व शर्ती

१) अनामत रक्कम रुपये ५०,०००/– (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) चा राष्ट्रीयकृत बॅकेचा डिमांड ड्राफ्ट, वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या नावाने निविदा अर्जासोबत संलग्नीत करणे आवश्यक आहे.

२) निविदाकर्त्यांने निविदा शुल्क (Cost of Tender) रुपये ५००/– राशी अदा करावयाचे आहे. (बिना परतावा) अथवा त्यांनी **रुपये ५००/– चा राष्ट्रीयकृत बॅकेचा डिमांड ड्रॉफ्ट, वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे नांवे निविदा अर्जासोबत संलग्नीत करणे आवश्यक आहे.**

३) विद्यापीठाचे सुरक्षेकरीता सुरक्षागार्ड सुरक्षा एजन्सीकडून निविदा मागविण्यात येत असून त्याकरीता अनामत रक्कमेचा डी.डी., आयकर क्लिअरन्स प्रमाणपत्र, इन्कम टॅक्स रिटर्न प्रमाणपत्र, सार्थ/ फर्म नोंदणी प्रमाणपत्र (अ.क्र. १ ते १० ची पुर्तता करणे आवश्यक आहे) तसेच इतर पुरक माहिती व प्रपत्र असावे.

निविदा प्रपत्रासह दिलेले दर प्रपत्रात सुरक्षा एजन्सीने सुरक्षागार्ड पुरवठा करीता निवीदा सादर करणा–यांनी दर व एकुण निविदा/ कंत्राट पुरवठा प्रस्ताव (दर प्रस्ताव) राशी अक्षरात व आकडयात निविदा प्रपत्रात दरवैधता कालावधीसह भरुन निविदा सादर करावयाचे आहे व त्यावर सही शिक्का असणे आवश्यक आहे.

४) **मोहोरबंद निविदा लिफाफे स्विकारण्याची अंतिम तारीख निविदा प्रकाशीत झाल्यापासुन दिनांक १९/११/२०१५ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत स्विकारण्यात येतील.**

५) **प्राप्त निविदेचे मोहोरबंद लिफाफे सोमवार, दिनांक २३/११/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. कुलसचिव, मा. वित्त व लेखा अधिकारी यांचे समक्ष निविदाधारक असल्यास त्यांचे समोर उघडण्यात येतील.** परंतु काही अपरीहार्य कारणास्तव उपनिर्दीष्ट अधिका–यांची उपस्थित नसल्यास त्यांच्या सोईनुसार पुर्वसूचना न देता उघडण्यात येऊ शकतील.

६) प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराचे अथवा कोणतेही दरपत्रक (निविदा) संपूर्णपणे किंवा अंशतः स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचा अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवला आहे. याबाबत कोणत्याही प्रकारची कारणे अथवा स्पष्टीकरण देणे विद्यापीठास बंधनकारक नाही.

७) निविदेत कमी दर नमूद करणारे पुरवठादार चांगल्या प्रकारच्या सुरक्षा गार्डचा पुरवठा करतीलच असे नाही ही बाब लक्षात घेता सुरक्षागार्डचा दर्जा विचारात घेउन दर मंजूर करण्यात येतील. सुरक्षागार्डचा चांगल्या कार्याचा अनुभव प्रमाणपत्र व चारिञ्य प्रमाणपत्र निविदेसोबत संलग्न करावे.

८) दरांबाबत कोणत्याही प्रकारच्या वाटाघाटी होणार नाही.

९) अनामत/ सुरक्षा रक्कम कोणत्याही दर कंत्राट करार झालेल्या सार्थास कराराच्या दिनांकापासुन ३ महिने कालावधी पर्यंत परत केल्या जाणार नाही व अनामत / सुरक्षा रकमेवर कोणत्याही प्रकारचा व्याज दिल्या जाणार नाही.

१०) निविदा प्रपत्रात नमूद करण्यात आलेली मागणी रद्द करण्याचे अधिकार विद्यापीठाने सुरक्षित ठेवले आहे. त्यानुसार पुरवठा आदेश देण्यात येईल.

११) निविदा प्रस्ताव प्रपत्रामध्ये नमुद नमून्याप्रमाणे मान्य केलेल्या प्रारुप / वर्णन नमुन्यानुसारच सुरक्षागार्ड बाबतची निविदा मंजूर झाल्यानंतर सार्थास कार्यालयीन सुरक्षागार्डवर पुरवठा आदेश प्राप्त झाल्यापासुन ३ दिवसाचे आत सुरक्षागार्डचा पुरवठा पुर्ण करावे लागेल. सुरक्षा एजन्सी कडून सुरक्षागार्डचा पुरवठा निकृष्ट दर्जाचा आढळल्यास देयकाचे शोधन करण्यात येणार नाही.

१२) दर करारात नमुद केलेले दर इन्कमटॅक्स, व्यवसाय कर, ईत्यादी खर्चासह विद्यापीठाच्या कार्यालयात अथवा त्यांनी सुचविलेल्या ठिकाणी पोहचविण्यासाठी असेल.

१३) कार्यालयीन आदेशानुसार मुदतीच्या आत सुरक्षागार्डचा पुरवठा न केल्यास सदर सुरक्षागार्ड द्वितीय लघुत्तम दर सार्थाकडून मान्य दरापेक्षा जास्त दराने करण्यात येईल व त्याकरीता द्यावी लागणारी अतिरिक्त रक्कम संबंधीत सार्थाच्या अनामत/ सुरक्षा रकमेतून अथवा ईतर देय असलेल्या देयकातून वसूल करण्यात येईल त्याचप्रमाणे अनामत/ सुरक्षा रक्कम पूर्णपणे जप्त करणे/ विलंबा बाबत दंड आकारणे हे सर्वस्वी विद्यापीठावर अवलंबून असून ते सुरक्षागार्ड पुरवठा धारकास बंधनकारक राहील.

१४) योग्य प्रारुपात सुरक्षागार्डचा पुरवठा केल्याची देयके दोन प्रतीत सादर करावे लागेल. तसेच रुपये ५०००/— किंवा त्यापेक्षा जास्त रकमेच्या देयकास राजस्व तिकीट (Revenue Stamp) लावावे लागेल.

१५) उपरोक्त अटी/ शर्ती संदर्भात कोणतीही अडचण उद्भवल्यास त्याबाबत अंतिम निर्णय देण्याचा अधिकार मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना राहील.

१६) कामाची व्याप्ती गोंडवाना विद्यापीठ व विद्यापीठाचे पदव्युत्तर शिक्षण विभाग गडचिरोली येथील कार्यालयांना संरक्षण आणि सुरक्षा प्रदान करणे समाविष्ट आहे तसेच विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग/ परिक्षा विभाग/ गोदाम / स्टोअर्स इ. साठी संरक्षण आणि सुरक्षा प्रदान करण्यासाठी सुरक्षा प्रणाली सुरक्षा एंजन्सीला पुरवावी लागेल.

१७) पुरवठा करण्यात येणारे सुरक्षा रक्षक शारिरीक दृष्ट्या सक्षम असावे तसेच त्यांचे वय वर्ष २५ ते ४५ दरम्यानचे असावे.

१८) विद्यापीठाच्या मालमत्तेची तसेच तेथील कर्मचाऱ्यांची सुरक्षेची तसेच विद्यापीठाच्या चल/अचल संप्पतीची सुरक्षेची प्राथमिक जबाबदारी सुरक्षा एंजन्सी वर असेल.

१९) १० दिवसाच्या आत करारनामा न केल्यास व्दितीय क्रमांकाच्या पुरवठाकारास निविदा प्रदान करण्यात येईल व प्रथम क्रमांकाच्या पुरवठाधारकाची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२०) सुरक्षा रक्षकाला दिले जाणारे वेतन हे ०८ तासाचे असेल. त्यामध्ये सार्वजनिक सुट्या, साप्ताहिक सुट्टी तसेच सुरक्षा रक्षकांच्या सुट्टया समाविष्ट असतील. तसेच सदरचे दर हे किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार असावेत.

२१) पुरवठाकाराला दर पत्रक सादर करतांना महाराष्ट्र शासन तसेच केंद्र शासनाव्दारे जाहिर केलेल्या किमान वेतना नुसार दर देने बंधनकारक आहे. त्यासाठी अद्यावत शासन निर्णय सोबत जोडणे आवश्यक आहे.

२२) करार कालावधीत ऐजंसीला त्यांनी दिलेले दर कोणत्याही कारणास्तव वाढवून दिले जाणार नाही.

२३) सुरक्षा रक्षकांचे वेतन त्यांच्या बचत खात्यामध्ये जमा करावे लागेल.

२४) पुरविण्यात आलेले सुरक्षा रक्षक हे पुरवठा करणाऱ्या ऐजंसीचे कर्मचारी असतील. त्यांच्या वेतनातुन कपात केली जाणारी सर्व रक्कम नियमानुसार भरण्याची पुर्णपणे जवाबदारी ही पुरवठा ऐजंसीवर असेल

२५) विद्यापीठाला आवश्यकतेनुसार लागणारे अतिरिक्त सुरक्षा रक्षकांचाही पुरवठा ऐजंसीला करारनाम्यात दिलेल्या दरानुसार करावा लागेल.

२६) नियुक्त केलेल्या सुरक्षा रक्षकांचा चारित्र पडताळणी अहवाल विद्यापीठास सादर करावा लागेल.

२७) एखाद्या जागेवर सुरक्षारक्षकाला नियुक्त केल्यास त्यांच्या जागेमध्ये फेरबदल करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवला आहे.

२८) विद्यापीठामार्फत सदर सुरक्षारक्षकांना कोणत्याही प्रकारची सुविधा उदा. वाहतुक, वैद्यकिय सेवा, राहण्याची व्यवस्था, गणवेष, जेवणाची व्यवस्था ई. दिली जाणार नाही.

२९) ऐजंसीव्दारे सुरक्षेसाठी आवश्यक असलेले साहित्य गणवेष, टार्च, छत्री, रेनकोट, काठी, शीटी, मेटल डिटेक्टर ई. साहित्य आवश्यकतेनुसार पुरविण्याची जवाबदारी असेल. रक्षकांना देण्यात आलेला गणवेष व ओळखपत्र त्यांनी कामाच्या वेळी घालने बंधनकारक राहील.

३०) कार्यालयीन वेळ संपल्यावर तसेच सुट्टीच्या दिवशी विजेचे दिवे, दरवाजे व खिडक्या बंद करणे तसेच मुख्य व्दारावर कुलुप लावण्याची जवाबदारी असेल.

३१) सुरक्षा रक्षकांना आग विझवण्यासाठी वापरात येणाऱ्या उपकराणाची माहिती असणे आवश्यक आहे.

३२) निष्काळजीमुळे होणारी जिवीत हानी तसेच विद्यापीठाच्या मालमत्तेचे होणाऱ्या हानीस सुरक्षा ऐजंसी जवाबदार राहील.

३३) कामाच्या वेळेस सुरक्षारक्षक अनुपस्थित असल्याचे निर्देशास आल्यास पुरवठा ऐजंसीवर दंडात्मक कार्यवाही केली जाईल व यासंदर्भात विद्यापीठाचा निर्णय अंतिम असेल.

३४) सुरक्षा रक्षक पुरवठा करण्यासाठी देण्यात आलेल्या आदेशानुसार ऐजंसीव्दारे निश्चित केलेल्या वेळेस व तारखेस सद्याच्या ऐजंसी कडुन ताबा घेणे बंद राहील. नवीन ऐजंसीव्दारे ताबा घेतल्यामुळे विद्यापीठाव्दारे पुर्वीच्या ऐजंसीबरोबर केलेला करार आपोआप संपुष्ठात येईल. नियुक्ती ऐजंसीव्दारे जर ताबा नियोजीत वेळी ताबा न घेतल्यास त्यांनी जमा केलेली अनामत रक्कम जप्त करून त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

३५) ऐजंसीव्दारे नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची वैयक्तीक माहिती, फोटो, शैक्षणिक योग्यतेची कागदपत्रे तसेच चारित्र पडताळणी प्रमाणपत्रे विद्यापीठात दहा दिवसाच्या आत जमा करणे बंधनकारक राहील.

३६) सुरक्षा कर्मचाऱ्यांचे महिण्याचे देयक पहिल्या आठवडयात जमा करावे लागेल. देयक सादर करतांना कर्मचारी भविष्य निधीची कपात करण्यात आलेली रक्कम तसेच विद्यापीठामार्फत देण्यात आलेली रक्कम कर्मचारी भविष्य निधी कार्यालयात कर्मचाऱ्याच्या खात्यात जमा केल्याची चालान जमा करणे बंधनकारक राहील.

३७) भविष्यनिधी कार्यालयात विद्यापीठ नियुक्त केलेल्या सुरक्षारक्षकांचे स्वतंत्र चालान जमा करणे बंधणकारक राहील.

३८) कर्मचाऱ्यांच्या खात्यावर कपात केलेली भविष्यनिधीची रक्कम नियुक्ती ऐजंसीव्दारे जमा न केल्यास त्यांच्या विरूध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

३९) निविदाकारास देण्यात येणारा सर्व्हीसचार्ज हा सुरक्षा रक्षकांच्या मासीक वेतनाच्या रकमेवर (EPF+Administrative Charges सोडुन) देण्यात येईल.

४०) अदा केलेल्या देयकातुन नियमानुसार टीडीएस कपात केला जाईल.

४१) नियुक्त केलेल्या सुरक्षा रक्षकांचा ESI काढण्याची जवाबदारी संबंधीत ऐजंसीवर राहील.

४२) Minimum Wages Act 1948, Workman Compensation Act 1923, ESI Act, 1948, Payment of Gratuity Act, 1972 and Employees Provident Fund and Miscellaneous Provision Act 1952, Payment of Bonus Act 1965, Payment of Wages Act 1936 नुसार असलेल्या सर्व तरतुदी या पुरवठा ऐजंसीवर बंधनकारक राहतील.

४३) विद्यापीठाने कोणतेही कारण न देता सर्व निविदा रद्द करण्याचा अधिकार राखुन ठेवलेला आहे.

४४) नियुक्त केलेल्या ऐजंसीला कार्य आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून दहा दिवसाच्या आत रूपये १००/— च्या मुद्रांकावर अटी व शर्ती मान्य असल्याचा करारनामा करून द्यावा लागेल.

वरिलप्रमाणे नमुद केलेल्या क्र. १ ते ४४ पर्यंतच्या अटी व शर्ती मी /आम्ही वाचल्या असून मला/ आम्हाला समजल्या असून त्या आम्हाला / मला मान्य आहेत.

ठिकाण :

दिनांक :

सुरक्षा ऐजंसी मालक / भागीदार यांची सही
पुर्ण पत्ता आणि दुरध्वनी क्रमांक

.....................................................

.....................................................

.....................................................

.....................................................

(शिक्का)

# निविदाधारकाने द्यावयाचे वचनपत्र

मी ------------------------------------------------------------------ घोषीत करतो की, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीने निविदा प्रपत्रासोबत सादर केलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत तद्नुषंगाने ठरवुन दिलेली अनामत/ सुरक्षा रकमेचा मा. वित व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीचे नांवे

१) बॅक ड्रॉफ्ट (बॅकेचे नांव ------------------------------------ ड्रॉफ्ट क्रमांक ---------------- रुपये --------------- राशी)

२) निविदा शुल्क बाबतचा मा. वित व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली नांवे बॅक ड्राफ्ट (बॅकेचे नांव ------------------------------------ ड्रॉफ्ट क्रमांक ---------------- रुपये --------------- राशी) तयार करुन सोबत सादर केलेला आहे.

ठिकाण :
दिनांक :

निविदा धारकाची सही ------------------
पूर्ण नांव --------------------------
संपूर्ण पत्ता --------------------------
--------------------------------------
दुरध्वनी क्र. भ्रमणध्वनी क्र. --------------
PAN क्रमांक -------------------------
--------------------------------------

## क रा र ना मा

विद्यापीठाची निविदा क्रमांक ---------- दि. ---------- तसेच कार्यालयीन आदेश क्र. -------------------- दि. ----------------मध्ये ठरवून दिलेल्या अटी व शर्ती/ नियमांचे माझ्याकडून उल्लंघन झाल्यास कायदेशीर कार्यवाही घेण्याचा व करारनामा तात्काळ रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठास राहील. करारनामा रद्द झाल्यास अनामत/ सुरक्षा रक्कमेवर माझा कोणताही अधिकार राहणार नाही असे शपथेवर करारपत्र लिहून देत आहे.

ठिकाण :

करारनामा लिहून देणाराची सही -----------------

दिनांक :

सुरक्षागार्ड कंपनीचे/सार्थाचे पूर्ण नांव ------------
--------------------------------------------

(रबरी शिक्का)

साक्षीदार : १) पुर्ण नांव ------------------------------------ सही --------------

२) पुर्ण नांव ------------------------------------ सही --------------

(सदर दरपत्रक पुरवठाकाराने आपल्या लेटरहेड वर द्यावे)

# निविदा दर पत्रक

| अ.क्र. | विवरण | दर |
|---|---|---|
| १ | वेतन<br>(किमान वेतन कायद्यानुसार) | ____________________ |
| २ | EPF<br>(शासकिय नियमाप्रमाणे दर)<br><br>निविदाकाराचा सर्व्हिस चार्ज | ____________________<br><br>____________________ |

सर्व्हिस चार्ज हा टक्केवारी(%) मध्ये नमुद करावा व तो मुळ वेतनावर ( EPF + Administrative चार्जेस वगळता) देण्यात येईल.

दिनांक :—

सही

ठिकाण :—

पुरवठाकाराचे नांव ——————————

संस्थेचे नांव ——————————